# नाशिक महानगरपालिका,नाशिक

## महानगरपालिका सचिवालय विभाग

## ई-निविदा सर्वसाधारण अटी/शर्ती

**कामाचे नांव :-** सन 2026-2027 साठी मा.महापौर सो यांचे कक्ष,मा.महापौर निवासस्थान (रामायण बंगला),मा.उपमहापौर कार्यालय,मा.स्थायी समिती साप्ताहीक बैठका,या सर्व कक्षा मध्ये येणाऱ्या महत्त्वाच्या अभ्यागतांसाठी व महासभा कामकाजाच्या वेळी मागविण्यात येणाऱ्या अल्पोहार/चहापान/थंडपेय/स्नेहभोजन/बिसलरी इत्यादी बाबी पुरविणे बाबत.

**ई-निविदा लिफाफा - 1 :** तांत्रिक निविदा (टेक्नीकल बीड) - यामध्ये खाली नमूद केलेले पुरावे/दाखले अपलोड करावेत. मात्र यामध्ये व्यापारी निविदा (कमर्शियल बीड) अपलोड करु नये. तांत्रिक निविदे सोबतच्या कागदपत्रां समवेत व्यापारी निविदापत्रक अपलोड केल्यास अशी निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल.

1) **निविदा फॉर्म फी (र.रु.500 + 90 + र.रु.90 जीएसटी सह असे एकुण र.रु.680/- ऑनलाईन भरल्याची पावती.)**
2) निविदा बयाणा रक्कम रुपये 21,000/- ऑनलाईन भरलेची पावती.
3) विक्रीकर नोंदणीची प्रमाणित प्रत किंवा विक्री करातून सूट असलेस तसा पुरावा/दाखला.
4) निविदाधारकाकडे निविदा भरण्याच्या दिनांकाला वैध असलेल्या शॉप ॲक्ट परवान्याची प्रत.
5) ई-निविदा सर्वसाधारण अटीशर्ती तसेच इतर अटीशर्ती मान्य असलेबाबत शिक्क्यानिशी स्वाक्षरी केलेला ई-निविदा सर्वसाधारण अटीशर्तीचा फॉर्म.
6) मक्तेदाराकडेस अन्न व औषधे प्रशासन विभागाकडील, मागील 5 वर्ष जुनी नोंदणी असल्याचे तसेच निविदा भरण्याच्या दिनांकाला वैध असलेल्या परवान्याची प्रत.
7) पॅनकार्डची प्रत.
8) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत व क्रमांक तसेच मागील तिन वर्षाचे मार्च 2023 पासुन चे 3B व भरणा केल्याचे चलन जोडावे.
9) माल पुरवठया बाबत मागणीनुसार मागणी करेल त्यावेळेस (24 तास) मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.
10) आय.ओ.सो. प्रमाण पत्र खाद्य पदार्थ सेवा नोंद असलेले जोडणे आवश्यक.
11) ई.पी.एफ नोंदणी प्रमाण पत्र तसेच किमान 50 कामगारांचे भरणा केल्याचे मागील 6 महीन्याचे E.C.R कॉफी व चलन प्रत जोडणे.
12) E.S.I.C नोंदणी प्रमाण पत्र तसेच किमान 50 कामगारांचे भरणा केल्याचे मागील 6 महीन्याचे E.C.R कॉफी व चलन प्रत जोडणे.
13) व्यवसाय कर नोंदणी प्रमाण पत्र तसेच मार्च 2025 अखेरचा निपटारा प्रमाणपत्र जोडावे.
14) 10 लाख रक्कमेचे राष्ट्रीयकृत बँकेची साल्वानसी प्रमाणपत्र जोडावे.
15) स्थानिक 5 वर्ष शॉप ॲक्ट जुनी नोंदणी असल्याचे नोंदणी पुरावा किंवा कार्यालय असल्याचा पुरावा जोडावा.
16) काळ्या यादीत समाविष्ठ नसल्याचे 100 रुपये चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र
17) मागील तिन वर्षाचा प्राप्तीकर दाखला.
18) शासकीय व निमशासकीय कार्यालयात चहा,नास्ता व भोजन सेवा समाधानकार करित्या पुरविल्याचे प्रमाणपत्र व संबंधीत संस्थेचे प्रमाणपत्र.

**ई-निविदा लिफाफा - 2** : व्यापारी निविदा/कमर्शिअल बीड- यामध्ये फक्त व्यापारी निविदा/कमर्शिअल बीड सादर करावे. (ई-निविदापत्रकात दर नमूद करुन शिक्क्यानिशी स्वाक्षरी करुन अपलोड करावे.)

**<u>सर्वसाधारण अटी/शर्ती.</u>**

1) प्रथम ई-निविदा **<u>लिफाफा</u>** -1 (तांत्रिक निविदा) उघडण्यात येतील. त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता निविदाधारकाने केलेली आहे, अशी खात्री झाली तरच ई-निविदा **<u>लिफाफा</u>**-2 मध्ये सादर केलेली ई-व्यापारी निविदा उघडण्यात येईल. अन्यथा त्या निविदाधारकाची निविदा रद्द समजण्यात येईल.

2) निविदाधारकाची निविदेसोबतची कोणतीही अट मान्य करण्यात येणार नाही. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येईल.

3) निविदेत नमूद केलेली संख्या/प्राकलन हे अंदाजे असून त्यात कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

4) निविदा अंतिम झाल्यानंतर ज्या निविदा नामंजूर होतील त्यांची निविदा बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

5) ज्या निविदाधारकाची संपुर्ण अथवा भागश: निविदा मंजूर होईल. त्या निविदाधारकास मनपाचे लाभात स्टँम्प पेपरवर प्राकलनाची रक्कम विचारात घेऊन योग्य त्या स्टँम्प पेपरवर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल व दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील.

6) सदरच्या निविदेची मुदत/कालावधी वैध आहे तोपर्यंत त्या दराने पुरवठा करणे/काम करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

7) निविदा बयाणा रक्कम, सुरक्षा अनामत रक्कम व इतर कोणत्याही रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

8) भरलेली संपुर्ण निविदा अथवा भागश: निविदा कोणतेही कारण न देता मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

9) मंजूर नमुन्याप्रमाणे/टेंडर स्पेशिफिकेशनप्रमाणे मालावर पुरवठा न झाल्यास/काम न केल्यास सदरचा माल परत करण्यात येईल/काम नाकारण्यात येईल. याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील.

10) निविदा मंजूर झाल्यानंतर सदरचे मालाचे दरात/कामाचे दरात दरवाढ झाल्यास दरवाढ झालेल्या दराने निविदाधारकास जादा पैसे मागता येणार नाही.

11) सुरक्षा अनामत - ज्या निविदाकाराची निविदा मंजुर होईल त्याला तसे लेखी कळविण्याच्या दिनांकापासुन 10 दिवसात शासन नियमानुसार सुरक्षा अनामत म्हणुन जमा करावी लागेल तसे न केल्यास त्याची निविदा रद्द करुन बयाणा रक्कम जप्त केली जाईल.

12) निविदाकाराची ऑफर निविदा उघडण्याच्या दिनांकापासुन 120 दिवस वैध राहील मात्र निविदाकाराच्या सहमतीने वैधता कालावधी वाढवता येऊ शकेल.

19) निविदाकाराने भरलेले दर मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन 1 वर्षासाठी वैध राहतील काही अपरिहार्य कारणास्तव सदर दरांना मक्तेदाराच्या सहमतीने व मा.आयुक्त यांच्या मान्यतेने मुदतवाढ देता येईल.

20) मक्तेदाराकडुन पुरविण्यात येणा-या खाद्य पदार्थांचा व पेयांचा दर्जा उच्च असावा.

21) खाद्य पदार्थ व पेये यांची मागणी ज्या वेळेस करण्यात येईल त्यावेळी व त्याठिकाणी उपलब्ध करुन द्यावे लागतील त्याला वेळेचे बंधन राहणार नाही.
22) वाहतुक किंवा इतर कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय राहणार नाही.
23) खाद्यपदार्थांच्या किंवा पेयांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी आल्यास किंवा वेळेत मालाचा पुरवठा न केल्यास किंवा कमी पुरवठा केल्यास दंड आकारण्यात येईल. दंडाची कमाल मर्यादा 10 टक्के राहील. वारंवार तक्रारी आल्यास करारनामा रद्द करण्याची देखील कारवाई केली जाईल.
24) मालपुरवठयात बदल सुचविल्यास माल खरेदी/पुरवठा अन्य ठिकाणाहुन करणेबाबतचा अधिकार निम्नलिखीत स्वाक्षरी करणा-याचा असेल.
25) पुरवठा करावयाच्या खाद्यपदार्थांचा व पेयांचे सविस्तर वर्णन सोबतच्या व्यापारी लिफाफयात दिलेले आहे. त्यासमोर अक्षरी व अंकी दर भरण्यात यावे. खाडाखोड असल्यास स्वाक्षांकीत करण्यात यावी.
26) ज्या संस्थेचे दर न्युनत्म असतील त्या संस्थेची निवड करुन कार्यआदेश देण्यात येईल.
27) प्राप्तदर हे जीएसटी करासह असावेत. शासनाच्या कुठल्याही कराचे दायित्व मनपा वर राहणार नाही.
28) नाशिक महानगरपालिकेने यापुर्वी ज्या मक्तेदाराचा ठेका रद्द करणेत आलेला आहे. त्यांनी या ई-निविदा मध्ये भाग घेणेत येऊ नये. घेतल्यास त्यांचे निविदा दरपत्रक उघडण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो.यांनी राखुन ठेवला आहे.
29) मा.सदस्यांनी व पदाधिकारी यांनी खादयपदार्थ पुरविण्याबाबत काही तक्रार केल्यास आपला ठेका रद्द करणेत येईल.
30) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका,नाशिक यांचे राहतील.
31) नाशिक महानगरपालिकेमध्ये यापुर्वी ज्या मक्तेदाराचा ठेका रदद करणेत आलेला आहे. त्यांनी या ई-निविदा मध्ये भाग घेऊ नये. भाग घेतल्यास त्यांचे निविदा दरपत्रक उघडण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.

नगरसचिव
नाशिक महानगरपालिका,नाशिक

आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक

सदर निविदेतील सर्व अटीशर्ती मी वाचल्या असून मला मान्य व कबूल आहे. त्यासाठी मी/आम्ही शिक्क्यानिशी स्वाक्षरी करीत आहे/आहोत.

**दिनांक :  /  /**

**ठिकाण :**

**निविदाधारकाची सही व शिक्का**

<u>**निविदा लिफाफा क्र. 2 ( व्यापारी लिफाफा )**</u>

कामाचे नांव :- सन 2026-2027 साठी मा.महापौर सो यांचे कक्ष,मा.महापौर निवासस्थान (रामायण बंगला),मा.उपमहापौर कार्यालय,मा.स्थायी समिती साप्ताहीक बैठका,या सर्व कक्षा मध्ये येणाऱ्या महत्त्वाच्या अभ्यागतांसाठी व महासभा कामकाजाच्या वेळी मागविण्यात येणाऱ्या अल्पोहार/चहापान/थंडपेय/स्नेहभोजन/बिसलरी इत्यादी बाबी पुरविणे बाबत.

| **अ. क्र.** | **तपशिल** | **प्रती महासभा अंदाजे** | **अंदाजे महासभा संख्या** | **अंदाजे प्रती प्लेट दर जी.एस.टी. सह** |
|---|---|---|---|---|
| 1. | अल्पोपहार सर्वसाधारण तपशिल :-<br>**अ)समोसा-2नग/कचोरी-2नग/बटाटेवडा-2नग/पाववडा-2नग/** सॅण्डविच-2नग/खमण ढोकळा (150 ग्रॅम) /इडली सांबार-2नग/पोहे(सर्वसाधारण 150 ग्रॅम) /उपमा(सर्वसाधारण 150 ग्रॅम)/शिरा(सर्वसाधारण 150 ग्रॅम)/साबुदाणा खिचडी(150 ग्रॅम) /साबुदाणा वडा-2नग किंवा तत्सम अल्पोपहाराचे पदार्थ आणि जिलेबी (सर्वसाधारण 100 ग्रॅम) किंवा सोनपापडी (सर्वसाधारण 100 ग्रॅम) किंवा तत्सम गोडपदार्थासह -<br>**ब)** जिलेबी/सोनपापडी/तत्सम गोडपदार्थ साधारण 100 ग्रॅम<br>सदरचा अल्पोपहार पुरेशा प्रमाणात व निश्चित केलेल्या जागेवर गरम करुन उपलब्ध करुन दयावा लागेल. | 350 प्लेट | 18 | प्रति प्लेट |
| 2. | चहा (150 एम.एल प्रती कप) | 5000 कप (गरजेनुसार) | 18 | प्रति कप |
| 3. | कॉफी (150 एम.एल प्रती कप) | 1500 कप (गरजेनुसार) | 18 | प्रति कप |
| 4. | जेवण <u>अमर्यादित थाळी - सर्वसाधारण मेनू :-</u><br>वरणभात / पुलाव भाजी (2) ओली आणि सुकी भाजी<br>पोळी/भाकरी/पुरी, कोशिंबीर,पापड,लोणचे.<br>गोड पदार्थ (मर्यादीत)-गुलाबजाम/श्रीखंड/रसमलाई/जिलेबी (सर्वसाधारण 100 ग्रॅम) 1 मिनरल वॉटर इ. | 350 व्यक्तींसाठी | 18 | प्रति थाळी |
| 5. | <u>मर्यादित थाळी सर्वसाधारण मेनू :-</u><br>वरणभात-एक वाटी /भाजी (2 वाटी) ओली आणि सुकी भाजी, पोळी /भाकरी -02 कोशिंबीर/ग्रीन सॅलड,गोड पदार्थ - गुलाबजाम / श्रीखंड/ रसमलाई/ जिलेबी (100 ग्रॅम) 1 मिनरल वॉटर इ. | 350 व्यक्तींसाठी | 18 | प्रति थाळी |
| 6. | ज्युस (संत्री,मोसंबी,अननस वगैरे) (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 7. | मिनलर वॉटर (**बिसलरी**) 1 लिटर | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 8. | थंड पेये :- लस्सी (सर्वसाधारण 150 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 9. | लिम्का (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 10. | कोकोकोला (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 11. | मिरिंडा (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 12. | थम्सअप (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |
| 13. | पेप्सी (सर्वसाधारण 200 मि.ली.) | गरजेनुसार | गरजेनुसार | |

मी/आम्ही वरीलप्रमाणे विविध प्रकारचे खाद्य पदार्थ जेवण व थंड पेये वर नमुद केलेल्या दरामध्ये पुरविण्यास तयार आहोत आमचे निविदा दर मंजुर झाल्यानंतर आपले अटीशर्तीनुसार आम्ही वरीलप्रमाणे खाद्य पदार्थ, जेवण व थंड पेये इ.चा पुरवठा करणेत येईल.

निविदाधारक सही व शिक्का

नगरसचिव

नाशिक महानगरपालिका,नाशिक

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

महानगरपालिका सचिवालय विभाग

ई-टेंडर निविदा सुचना क्र.01

नाशिक महानगरपालिकेच्या महानगरपालिका सचिवालय विभागा करीता सन 2026-2027 साठी मा.महापौर सो यांचे कक्ष,मा.महापौर निवासस्थान (रामायण बंगला),मा.उपमहापौर कार्यालय,मा.स्थायी समिती साप्ताहीक बैठका,या सर्व कक्षा मध्ये येणाऱ्या महत्त्वाच्या अभ्यागतांसाठी व महासभा कामकाजाच्या वेळी मागविण्यात येणाऱ्या अल्पोहार/ चहापान/थंडपेय /स्नेहभोजन/बिसलरी इत्यादी बाबी पुरविणे कामी वार्षिक दर मंजुर करावयाचे आहेत. त्यासाठी ई-टेंडर (ऑनलाईन) निविदा मागविणेत येत आहे.

1) सविस्तर निविदा नोटीस मनपाचे संकेत स्थळावर (web site) प्रसिध्द केलेली आहे. त्याचे प्रथम अवलोकन करावे.

2) निविदा संचाची विक्री https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू आहे.

3) ऑनलाईन निविदा संच विक्री दि. 02/ 04 /2026 ते दि.15/04/2026 या कालावधी मध्ये केली जाईल.

4) वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म फि र.रु.500 + 90 + र.रु.90 जीएसटी सह असे एकुण र.रु.680/- ऑनलाईन भरण्यात यावी.

5) ऑनलाईन सादरीकरणाची अंतिम मुदत दि. 15 / 04 /2026 दु 3.00 वाजेपर्यंत राहील.

6) ऑनलाईन सादर केलेल्या निविदा दि. 15 / 04 /2026 रोजी दुपारी 3.00 वाजेनंतर शक्य झाल्यास नगरसचिव व उपस्थित निविदाधारक यांचे समक्ष उघडण्यात येतील.

7) कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अंतिम अधिकार मा.आयुक्त सो. नाशिक महानगरपालिका,नाशिक यांचे राहतील.

8) नाशिक महानगरपालिकेमध्ये यापुर्वी ज्या मक्तेदाराचा ठेका रदद करणेत आलेला आहे. त्यांनी या ई-निविदा मध्ये भाग घेऊ नये. भाग घेतल्यास त्यांचे निविदा दरपत्रक उघडण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.

नगरसचिव
नाशिक महानगरपालिका,नाशिक

आयुक्त
नाशिक महानगरपालिका,नाशिक